**SAMPLE CONTENT**

# परिसर अभ्यास (भाग - २)

## आपण असे घडलो

# WORKBOOK





Published by:

LAZY BONE EDUCATION

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
यांच्याद्वारे नियोजित अभ्यासक्रमावर आधारित.

# परिसर अभ्यास (भाग २)

## आपण असे घडलो

# WORKBOOK

## इयत्ता पाचवी (मराठी माध्यम)

### टळक वैशिष्ट्ये

- प्रत्येक पाठाच्या सुरुवातीला पाठाची उजळणी अंतर्भूत
- पाठ्यपुस्तकातील स्वाध्यायामध्ये अंतर्भूत सर्व प्रश्नांचा समावेश
- संपूर्ण सरावाकरिता विविध प्रकारचे प्रश्न समाविष्ट
- पाठाच्या उजळणीकरिता प्रत्येक पाठात स्वतंत्र तोंडी परीक्षा विभाग अंतर्भूत
- अध्ययन अनुभूतीकरिता पाठातील कृती / उपक्रमांचा समावेश
- उत्तरांसाठी पुरेशी जागा उपलब्ध

Sample Content

नाव : ____________________

शाळा : ____________________

इयत्ता : __________ तुकडी : __________ हजेरी क्र. : __________

Printed at: **Print to Print,** Mumbai

© *Lazy Bone Education*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2022MH0007
**TEID: 3424**
P.O. No. 11118

# प्रस्तावना

नमस्कार,

शिक्षण मंडळाने निर्धारित केलेला 'आपण असे घडलो (परिसर अभ्यास भाग-२)' हा पाठ्यक्रम कृतिप्रधानता व ज्ञानरचनावादावर भर देणारा आहे. प्राथमिक शिक्षणातील या टप्प्यावर विद्यार्थ्यांनी किमान क्षमता आणि जीवनकौशल्ये प्राप्त करावीत आणि शिक्षणाची प्रक्रिया रंजक आणि आनंददायी व्हावी हा दृष्टिकोन समोर ठेवून या पाठ्यपुस्तकाची रचना करण्यात आली आहे. या पाठ्यक्रमावर आधारित **लेझी बोन एज्युकेशनचे परिसर अभ्यास (भाग-२) आपण असे घडलो इयत्ता पाचवी Workbook** हे पुस्तक विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हांला आनंद होत आहे.

सातत्यपूर्ण व सर्वंकष मूल्यमापनाच्या (CCE Pattern) दृष्टीने पुस्तकाची रचना केली आहे. या पद्धतीच्या उद्दिष्टांच्या अनुषंगाने, या पुस्तकात पाठाची संकलित मूल्यमापन व आकारिक मूल्यमापन अशा दोन भागांत रचना करण्यात आली आहे. प्रत्येक पाठाच्या प्रभावी उजळणीकरिता पाठाच्या सुरुवातीला **'चला, उजळणी करूया!'** हा भाग दिला आहे. यात महत्त्वपूर्ण मुद्दे, तक्ते यांचा समावेश करण्यात आला आहे. यानंतर सुरू होणाऱ्या 'संकलित मूल्यमापन' या विभागात पाठावर आधारित प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे. या विभागाची विभागणी **'पाठ्यपुस्तकातील स्वाध्याय'**, **'चला, सराव करूया!'**, **'तोंडी परीक्षा'** अशा उपविभागांत केली आहे.

**'पाठ्यपुस्तकातील स्वाध्याय'** या विभागात पाठ्यपुस्तकामध्ये पाठाच्या शेवटी दिलेल्या स्वाध्यायातील सर्व प्रश्न क्रमवार दिलेले आहेत. **'चला, सराव करूया!'** या शीर्षकाअंतर्गत विद्यार्थ्यांच्या अधिकच्या सरावाकरिता वैविध्यपूर्ण प्रश्न समाविष्ट करण्यात आले आहेत. तसेच पाठ्यपुस्तकातील स्वाध्याय आणि चला सराव करूया या विभागांतील ज्या प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यानुरूप वेगवेगळी असू शकतील, अशा प्रश्नांना **'मुक्तोत्तरी प्रश्न'** म्हणून संबोधले आहे. **'तोंडी परीक्षा'** या विभागात ज्यांची तोंडी उत्तरे दिली जाऊ शकतील अशा विचारांना चालना देणाऱ्या वस्तुनिष्ठ प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे. यानंतर येणाऱ्या 'आकारिक मूल्यमापन' या विभागामध्ये पाठावर आधारित कृती/उपक्रम समाविष्ट करण्यात आले आहेत.

या Workbook मधून सर्वोत्तम परिणाम मिळविण्यासाठी, विद्यार्थ्यांनी शाळेत एखादा पाठ शिकवून झाला की लगेच त्याचा सराव करावा आणि कोणत्याही पुस्तकाचा आधार न घेता स्वतः प्रश्नांची उत्तरे लिहावीत. उत्तरे लिहिण्यासाठी पुरेशी जागा देण्यात आली आहे. वेळोवेळी Workbook पूर्ण करण्याच्या सवयीमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाचे स्वयंपरीक्षण करता येईल आणि त्यांच्या परीक्षेतील यशाचा मार्ग सुगम होईल.

हे पुस्तक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. याकरिता आपला अभिप्राय support@lazybone.in या इ-मेल पत्त्यावर पाठवावा, ही नम्र विनंती.

प्रकाशक

**आवृत्ती :** प्रथम

Sample Content

**Disclaimer**

This reference book is transformative work based on textbook of 'आपण असे घडलो परिसर अभ्यास (भाग - २); पुनर्मुद्रण : सप्टेंबर २०२१' published by Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

# टळक वैशिष्ट्ये

## सातत्यपूर्ण आणि सर्वंकष मूल्यमापन (CCE) स्वरूप

या पुस्तकात CCE पद्धत अनुसरण्यात आली असून, पाठाचे 'संकलित मूल्यमापन' आणि 'आकारिक मूल्यमापन' अशा दोन भागांत विभाजन करण्यात आले आहे. हे पुस्तक विद्यार्थी केंद्रित असून यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मदत होईल.

## चला उजळणी करूया!

'चला उजळणी करूया!' शीर्षकांतर्गत पाठाचा आढावा घेण्यात आला आहे.

## प्रश्नांची वैविध्यता

पाठ्यपुस्तकामधील पाठांच्या स्वाध्यायातील प्रश्नांचा क्रमवार समावेश करण्यात आला आहे. याव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना पाठाचा अधिक चांगला सराव करता यावा यासाठी विविध प्रकारचे अधिकचे प्रश्नही समाविष्ट आहेत.

## मुक्तोत्तरी प्रश्न

या प्रश्नांत विद्यार्थ्यांना (त्यांच्या निरीक्षण क्षमतेनुसार) स्वतः प्रश्नाचे उत्तर देण्याचे स्वातंत्र्य मिळते. या प्रकारच्या प्रश्नांमुळे विद्यार्थ्यांचे निरीक्षण कौशल्य आणि तर्कशक्ती विकसित होण्यास मदत होईल.

## तोंडी परीक्षा

'तोंडी परीक्षा' या विभागात विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना देणाऱ्या आणि पाठात समाविष्ट असलेल्या संकल्पनांच्या आकलनाचे मूल्यमापन करता येईल अशा प्रश्नांचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

Sample Content

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | इतिहास म्हणजे काय ? | १ |
| २. | इतिहास आणि कालसंकल्पना | ६ |
| ३. | पृथ्वीवरील सजीव | १३ |
| ४. | उत्क्रांती | १६ |
| ५. | मानवाची वाटचाल | २१ |
| ६. | अश्मयुग : दगडाची हत्यारे | २९ |
| ७. | निवारा ते गाव-वसाहती | ३७ |
| ८. | स्थिर जीवनाची सुरुवात | ४३ |
| ९. | स्थिर जीवन आणि नागरी संस्कृती | ४९ |
| १०. | ऐतिहासिक काळ | ५४ |


टीप : पाठाखाली दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.

Sample Content

# १. इतिहास म्हणजे काय ?

## चला, उजळणी करूया !

➢ **इतिहास : भूतकाळातील घटनांचे ज्ञान करून देणारे शास्त्र**

१. घटनांचा क्रम समजून घेताना व्यवहाराच्या सोयीसाठी काळाचे भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ असे भाग पाडता येतात. निघून गेलेला क्षण म्हणजे भूतकाळ होय, आताचा चालू क्षण म्हणजे वर्तमानकाळ होय आणि येणारा क्षण म्हणजे भविष्यकाळ होय.

२. भूतकाळात घडलेल्या घटना समजून घेण्याच्या शास्त्राला **इतिहास** म्हणतात.

➢ **इतिहासाची शास्त्रीय पद्धत**

१. प्रत्येक शास्त्र हे काही पुराव्यांवर आधारित असते. प्रत्येक पुरावा वेगवेगळ्या कसोट्यांवर तपासून तो विश्वास ठेवण्याजोगा आहे, की नाही हे ठरवण्याच्या पद्धतीला शास्त्रीय पद्धत असे म्हणतात.

२. इतिहासातील घटनांचा खरेखोटेपणा जाणून घेण्यासाठी भूतकाळातील या घटना पुन्हा जशाच्या तशा घडवून आणण्याचे प्रयोग करणे शक्य नसते. त्यामुळे, इतिहास मांडण्याची पद्धत इतर शास्त्रांपेक्षा वेगळी आहे.

३. इतिहासामध्ये पुरावे शोधणे, तो तपासणे आणि पुराव्यांच्या आधारे भूतकाळातील घटना क्रमवार जुळवणे यासाठी शास्त्रीय पद्धतीचाच उपयोग केला जातो.

४. त्यासाठी गरज असेल, तर इतर शास्त्रांचीही मदत घेतली जाते. या आधारे इतिहास हे एक शास्त्र आहे, ते केवळ कल्पनेच्या आधारे लिहिले जात नाही.

५. **इतिहासाची साधने :** भूतकाळाचा शोध घेण्यासाठी इतिहासाची साधने आपल्याला पुरावे पुरवतात. उदा: प्राचीन वस्तू, कोरीव लेख, लोककथा इत्यादी. इतिहासाच्या साधनांचे भौतिक साधने, लिखित साधने, मौखिक साधने हे तीन प्रकार असतात. या साधनांतून मिळणाऱ्या पुराव्यांच्या खरेखोटेपणाची कसून तपासणी केली जाते. कसोटीला उतरलेल्या पुराव्यांच्या आधारे भूतकाळातील घटना क्रमवार जुळवून इतिहासाची मांडणी केली जाते. अशाप्रकारे, इतिहासाची मांडणी करण्याची ही **शास्त्रीय पद्धत** होय.

➢ **इतिहास आणि आपण**

१. प्रत्येक शास्त्र आपापल्या विषयांचा अभ्यास करते. इतिहास भूतकाळातील घटनांचा अभ्यास करतो.

२. भूतकाळातील, तसेच वर्तमानकाळातील माणसाच्या व्यक्तिगत किंवा सामूहिक कृती आणि कृतींचे परिणाम भविष्यकाळावर घडत असतात.

३. त्यांचे परिणाम मानवी समाजाच्या प्रगतीसाठी पोषक किंवा हानिकारक वातावरण निर्माण करतात, त्याचा परिणाम आपल्या रोजच्या जगण्यावर होतो.

४. **इतिहासाच्या अभ्यासाचे फायदे :**

(i) इतिहासाच्या अभ्यासामुळे भूतकाळातील मानवी समाजाचे विचार, कृती आणि कृतींचे परिणाम यांचा शोध घेता येतो, अनेक प्रश्नांची उत्तरे इतिहासात शोधता येतात.

(ii) या अभ्यासामुळे मानवी समाजाच्या प्रगतीसाठी योग्य काय, अयोग्य काय यांचा अभ्यास करणे शक्य होते. म्हणजेच, इतिहासाच्या अभ्यासातून वर्तमानकाळात आपण कसे वागल्याने भविष्यकाळ चांगल्या प्रकारे घडवता येईल, हे समजते.

(iii) भूतकाळात होऊन गेलेल्या थोर व्यक्तींच्या चरित्रांतून स्फूर्ती आणि प्रेरणा मिळवून देण्याचे कार्यही इतिहास करतो.

(iv) इतिहासामुळे आपली आणि इतर संस्कृती यांच्यात झालेली देवाणघेवाण समजते.

(v) मानवी संस्कृतीच्या विकासाची वाटचाल आणि माणसांच्या जीवनपद्धतींत कसे बदल होत गेले, हेसुद्धा समजून घेता येते.

५. प्रत्येक ठिकाणाचा, वस्तूचा आणि सजीवाचा एक इतिहास असतो. प्रत्येक गावाचा, जिल्ह्याचा, राज्याचा, देशाचा तसेच, पृथ्वी, पृथ्वीवरील डोंगर, जलाशय, प्राणिसृष्टी, माणूस या सर्वांचा स्वतंत्र इतिहास आहे.

६. प्रत्येक शास्त्राचाही स्वत:चा इतिहास असतो. त्याच्या आधारे मानवी संस्कृतीत महत्त्वाचे बदल घडवून आणणाऱ्या अनेक शास्त्रीय शोधांची आणि ते शोध लावणाऱ्या शास्त्रज्ञांची माहिती आपल्याला मिळते.

Sample Content

➢ **भूतकाळ आणि भविष्यकाळ**

१. भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ हे विविध घटनांच्या अखंड साखळीने जोडलेले असतात. म्हणून, आज घडणाऱ्या घटना या आपण पूर्वी केलेल्या कृतींशी जोडलेल्या असतात.
२. पूर्वी केलेल्या म्हणजे भूतकाळातील कृतींवर भविष्यकाळ अवलंबून असतो, हे इतिहासाच्या अभ्यासातून आपण शिकतो.
३. भूतकाळातील शोधांच्या आधारानेच पुढचे नवनवीन शोध लावणे शक्य असते.

## संकलित मूल्यमापन

### पाठ्यपुस्तकातील स्वाध्याय

### I. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

*१. भूतकाळात घडलेल्या घटना समजून घेण्याच्या शास्त्राला ---------------- म्हणतात.

*२. इतिहास केवळ ---------------- च्या आधारे लिहिला जात नाही.

### II. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

*१. **शास्त्रीय पद्धत म्हणजे काय ?**

उत्तर :

*२. **स्वातंत्र्यप्राप्ती ही घटना कोणत्या कृतीचा परिणाम आहे ?**

उत्तर :

*३. **इतिहासाच्या अभ्यासामुळे कोणती गोष्ट शक्य होते ?**

उत्तर :

### III. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

*१. **इतिहास हे शास्त्र आहे असे का म्हटले जाते ?**

उत्तर :


Sample Content

*२. **गावाच्या विकासात अडथळे कसे निर्माण होतात ?**

उत्तर :

## IV. संकल्पनाचित्र तयार करा.

*१.




## V. वर्गीकरण करा.

*१. **पुढील तक्त्यात इतिहासाच्या साधनांचे वर्गीकरण करा.**

**इतिहासाची साधने –** नाणी, पत्रव्यवहार, किल्ले, जात्यावरील ओव्या, भांडी, ताम्रपट, वाडे, शिलालेख , लोकगीते, स्तंभ, चरित्रग्रंथ, लेणी, लोककथा.

उत्तर :

| भौतिक | लिखित | मौखिक |
|---|---|---|
| | | |
| | | |

Sample Content

| | | |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

**चला, सराव करूया!**

## I. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

१. ____________ हा अजून यायचा असतो.

२. प्रत्येक पुरावा वेगवेगळ्या कसोट्यांवर तपासून तो विश्वास ठेवण्याजोगा आहे, की नाही हे ठरवण्याच्या पद्धतीला ____________ पद्धत असे म्हणतात.

३. हस्तलिखिते हे इतिहासाचे ____________ साधन आहे.

## II. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

**१. कोणते शब्द भूतकाळ दर्शवतात?**

उत्तर :

**२. सर्व शास्त्रांचे वैशिष्ट्य कोणते?**

उत्तर :

**३. इतिहास मांडण्याची पद्धत इतर शास्त्रांपेक्षा वेगळी का आहे?**

उत्तर :

## III. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

**१. इतिहासाचा अभ्यास करणे गरजेचे का आहे?** (मुक्तोत्तरी प्रश्न)

उत्तर :

Sample Content

**२. भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ हे एकमेकांशी कशाप्रकारे जोडलेले असतात ?**

उत्तर :

## तोंडी परीक्षा

१. आपल्या जन्मदिवसापासून आजपर्यंतच्या निघून गेलेल्या काळाला आपण काय म्हणतो ?
२. इतिहास म्हणजे काय ?
३. इतिहासाच्या साधनांचे तीन प्रकार कोणते आहेत ?

## आकारिक मूल्यमापन

### उपक्रम

***१. तुमच्या गावातील / परिसरातील ऐतिहासिक वास्तूंची आणि प्राचीन धार्मिक स्थळांची माहिती व चित्रे संकलित करा.**

***२. तुमच्या शाळेचा इतिहास जाणून घेण्यासाठी तुम्ही कोणकोणत्या साधनांचा वापर कराल, याची यादी तयार करा व साधनांवरून तुम्हांस कोणती माहिती मिळू शकेल ते लिहा.**
**जसे - शाळेची कोनशिला : शाळेची स्थापना, उद्घाटक इत्यादी.**

Sample Content

शिक्षकांचा शेरा : दिनांक :

## AVAILABLE BOOKS FOR STD. V:
(ENG., MAR. & SEMI ENG. MED.)

### NOTES
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- Environmental Studies (Part ONE & TWO)
- Mathematics

### WORKBOOK
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- Environmental Studies (Part ONE)
- Environmental Studies (Part TWO)
- Mathematics

## AVAILABLE BOOKS FOR STD. VI:
(ENG., MAR. & SEMI ENG. MED.)

### NOTES
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History-Civics
- Geography
- General Science
- Mathematics

### WORKBOOK
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History-Civics
- Geography
- General Science
- Mathematics

### ADDITIONAL TITLES
- English Grammar & Writing Skills Book
- Hindi Grammar & Writing Skills Book
- Marathi Grammar & Writing Skills Book




Scan the QR code to buy e-book version of Target's Notes on Quill - The Padhai App

### OUR PRODUCT RANGE
Children Books | School Section | Junior College
Degree College | Entrance Exams | Stationery

**Visit Our Website**

Marketed by:

**Target Publications® Pvt. Ltd.**
Transforming lives through learning.


**Address:**
B2, 9th Floor, Ashar, Road No. 16/Z,
Wagle Industrial Estate, Thane (W)- 400604

**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15
**Website:** www.targetpublications.org
**Email:** mail@targetpublications.org




Explore our range of **STATIONERY**